# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 25.02.2026** **वार- बुधवार**

---

**<u>नोंद</u>**

पुण्यातील शिरूर तालुक्यातील आरणगाव इथं शास्त्रीय पद्धतीनं लागवड केलेल्या गव्हाच्या रोपाची उंची पाच फूट झाली आहे. आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत केलेल्या या प्रयोगाची कृषी विभागानं दखल घेत राज्यस्तरीय कृषी स्पर्धेत नोंद केली आहे. पिकाच्या वाढीवरून एका एकरातून 30 ते 32 क्विंटल उत्पादन मिळण्याची अपेक्षा आहे. योग्य हवामान आणि काढणीपर्यंत पिकाची काळजी घेतल्यास हा अंदाज प्रत्यक्षात येऊ शकतो, असं कृषी तज्ज्ञांचं मत आहे. शेतकरी लेंडे यांनी 'गोल्ड 71' या उच्च उत्पादक जातीची निवड करून एका एकर क्षेत्रात 26 किलो बियाणाची पेरणी केली. त्यानंतर तज्ञ कृषी अधिकाऱ्यांचं मार्गदर्शन घेतलं.

**<u>ठाकूर</u>**

धोरणनिर्मिती, प्रशासन आणि सार्वजनिक सेवेतील गुंतागुत समजून तरुणांनी राजकीयदृष्ट्या कुशल, प्रशासन-जाणकार आणि सामाजिकदृष्ट्या संवेदनशील बनविण्यासाठी महाविद्यालय परिसरातूनच एक नवी पिढी निर्माण होऊ शकते असं मत लोकसभा सदस्य आणि माजी केंद्रीय मंत्री अनुराग सिंह ठाकूर यांनी काल पुण्यात व्यक्त केलं. एमआयटी विश्वशांती विद्यापीठ आणि एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंट यांच्या वतीनं आयोजित करण्यात आलेल्या १५ व्या भारतीय छात्र संसदेच्या समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. एकविसाव्या शतकात कॅम्पसमधून कॅबिनेटमध्ये जाण्याचा विचार करत असाल तर एआय नैतिकतेशी जुळवून घेतलं पाहिजे असा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

**<u>पद</u>**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत सध्या कोणत्याही पदासाठी भरती प्रक्रिया सुरू नसल्याची स्पष्ट माहिती प्रशासन विभागानं दिली आहे. समाजमाध्यमांवर महानगरपालिकेत विविध पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू असल्याचं भासवणारी खोटी आणि दिशाभूल करणारी माहिती प्रसारित केली जात आहे. तसंच महापालिकेच्या नावानं बनावट नियुक्तीपत्रं, उमेदवारांची यादी देखील प्रकाशित केली जात आहे. परंतु महानगरपालिकेकडून भरती प्रक्रियेबाबत अद्याप कोणतेही अधिकृत आदेश अथवा सूचना जारी करण्यात आलेल्या नाहीत, अशी माहिती प्रशासन विभागाच्या वतीनं देण्यात आली आहे. त्यामुळं इतर कोणत्याही माध्यमांद्वारे प्रसारित होणाऱ्या माहितीवर विश्वास न ठेवता नागरिकांनी अधिकृत संकेतस्थळावर भेट देऊनच तिची खातरजमा करावी, असं आवाहन प्रशासन विभागाचे सहआयुक्त मनोज लोणकर यांनी केलं आहे.

**<u>क्लिनिक</u>**

गरीब, गरजू, मजूर, वस्ती भागांतील नागरिकांसाठी रुग्ण हक्क परिषदेच्या वतीनं 'पृथ्वी मोबाईल क्लिनिक'चा उपक्रम सुरु करण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत अवघ्या पाच रुपयांत आरोग्य तपासणी आणि औषधोपचार उपलब्ध करून दिले जात आहेत. या उपक्रमातील एकशेअकरा शिबिरांमधून आजवर दहाहजारपेक्षा जास्त रुग्णांना लाभ झाला आहे, अशी माहिती रुग्ण हक्क परिषदेचे संस्थापक उमेश चव्हाण यांनी दिली. सध्या पुण्यातील ६० ठिकाणी ही आरोग्यसेवा दिली आहे. एमआरआय आणि सिटी स्कॅन यासारख्या तपासण्या मोफत केल्या जात आहेत.

तसंच गंभीर आजारांवर शस्त्रक्रियांसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या माध्यमातून अर्थसहाय्य उपलब्ध करून दिलं जात आहे. प्रत्येक वस्तीत महिन्यातून एकदा तपासणी आणि औषधोपचार केले जात आहेत. गरजूंना दर्जेदार उपचार मिळावेत, या भावनेतून रुग्ण हक्क परिषदेच्या माध्यमातून २५ लाख रुपयांच्या स्वखर्चानं हा अद्ययावत 'व्हॅनिटी' दवाखाना निर्माण केला आहे.

**<u>पुरस्कार</u>**

पुणे शहर पोलिस आयुक्तालयात 'पीटीपी' ॲप कारवाईतील विजेत्यांचा पुरस्कार वितरण समारंभ उत्साहात पार पडला. पुणे शहर वाहतूक शाखेमार्फत आयोजित या कार्यक्रमात 'पीटीपी' ॲपद्वारे सर्वाधिक वाहतूक नियमभंग नोंदविणाऱ्या नागरिकांचा गौरव करण्यात आला. आतापर्यंत 93 हजार 190 नागरिकांनी ॲपचा वापर केला असून, 1 लाख 81 हजार 555 तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यापैकी 1 लाख 32 हजार 485 प्रकरणांची पडताळणी करून कारवाई करण्यात आली आहे. त्यामध्ये 3 कोटी रुपयांपेक्षा जास्त दंड वसूल करण्यात आला आहे. नागरिकांनी 'पीटीपी' ॲपचा अधिकाधिक वापर करावा, असं आवाहन वाहतूक पोलिसांनी केलं आहे.

**<u>ॲप</u>**

पुणे शहरातील वाहतूक पोलिसांनी वाहतूक व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यासाठी गुगल मॅपच्या सहाय्याने ट्रॅफिक्युअर हे अत्याधुनिक सॉफ्टवेअर विकसित केलं आहे. त्यामुळं पुणे शहरातील प्रमुख तसंच अंतर्गत रस्त्यांवर वारंवार होणारी वाहतूक कोंडी याबाबत प्रत्यक्ष वेळेत माहिती प्राप्त होणार आहे. त्याचबरोबर गुगल मॅपच्या साह्यानं वाहनांच्या गर्दीचं व्यवस्थापन करण्यासाठी चौकातील सिग्नलची वेळ ठरविली जाणार असल्याची माहिती पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली. या सॉफ्टवेअरचं सादरीकरण पोलीस आयुक्तालयात करण्यात आलं.

**<u>ट्रॅश बॅरिअर</u>**

पुणे शहरातील मुठा नदीला प्रदूषणमुक्त करण्यासाठी नदीत तरंगणारा प्लास्टिक कचरा, प्लास्टिक बाटल्या, थर्माकोल आणि अन्य प्लास्टिक साहित्य अडविण्यासाठी नदीपात्रात 'ट्रॅश बॅरिअर' बसविण्याचा निर्णय महानगरपालिका प्रशासनाने घेतला आहे. बाबा भिडे पुलाजवळ एका खाजगी संस्थेने राबविलेल्या प्रयोगाला मिळालेल्या यशानंतर असे बॅरिअर उभारण्याची योजना आखली जात आहे. यासाठी आगामी अर्थसंकल्पात निधीची तरतूद केली जाणार आहे, अशी माहिती महापालिकेच्या पर्यावरण विभागाच्या उपायुक्त किशोरी शिंदे यांनी दिली आहे.

**<u>कार्यशाळा</u>**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ आणि साहित्यप्रेमी भगिनी मंडळातर्फे उद्या पुण्यात ज्येष्ठ लेखिका ज्योत्स्ना देवधर यांच्या जन्मशताब्दीनिमित्त नवलेखक कथा कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. ही कार्यशाळा सर्वांसाठी खुली आहे, अशी माहिती साहित्यप्रेमी भगिनी मंडळाच्या कार्यकारी विश्वस्त डॉक्टर मंदा खांडगे यांनी एका निवेदनाद्वारे दिली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**